**ठळक बातम्या**

- १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्लीत भारत मंडपम इथं प्रारंभ
- चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासह विविध जागतिक नेत्यांचं ब्रिक्स शिखर परिषदेसाठी दिल्लीत आगमन
- कोविड महामारी दरम्यान थांबलेली भारत- चीन विमानसेवा पुन्हा सुरु होणार
- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचा अंतिम सामना आज अरीना साबालेंका आणि एलेना रिबाकीना यांच्यात रंगणार

**आणि**

- महिला क्रिकेट टी ट्वेंटी आशिया चषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि श्रीलंका यांच्यात लढत

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आजपासून १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेला सुरुवात होत असून या दोन दिवसीय भव्य कार्यक्रमात ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, भारत, इराण, रशिया, सौदी अरब, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिरात या जगातल्या प्रमुख उदयोन्मुख राष्ट्रांचे प्रमुख आणि प्रतिनिधी सहभागी होत आहेत. भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिषदेची संकल्पना लवचिकता, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता यांच्यासाठी उभारणी अशी आहे. या अत्यंत महत्त्वाच्या शिखर परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान हे नेते सहभागी होणार आहेत.

या उच्चस्तरीय परिषदेत ब्रिक्स सदस्य राष्ट्रांचे नेते जागतिक प्रशासन, बहुपक्षीयवाद, व्यापार आणि गुंतवणूक, तंत्रज्ञान, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा, आरोग्यसेवा, आपत्ती व्यवस्थापन आणि महत्त्वपूर्ण पुरवठा साखळ्या इत्यादी मुद्द्यांवर चर्चा करण्याची शक्यता आहे.

<><><><><>

ब्रिक्स शिखर परिषदेसाठी विविध देशांचे प्रमुख तसंच परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींचं आगमन होत आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग दिल्लीत पोहोचले असून व्हिएतमानचे प्रधानमंत्री ले मिन्ह हुंग, बेलारुसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मॅक्सिम राइजेनकोव आणि जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक डॉ. टेडरॉस अधनॉम घेब्रेसस दिल्लीत दाखल झाले आहेत.

<><><><><>

ब्रिक्स परिषदेनिमित्त भारतात आलेल्या विविध राष्ट्रप्रमुखांशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वपूर्ण द्विपक्षीय बैठका सुरु आहेत. याअंतर्गत प्रधानमंत्र्यांनी आज इथिओपियाचे प्रधानमंत्री डॉ. अबी अहमद अली यांच्याशी चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्यावर भर दिला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याशीही व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, तसंच नागरिकांमधले संबंध इत्यादी मुद्द्यांवर चर्चा केली. याशिवाय अबुधाबीचे क्राउन प्रिन्स शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान आणि व्हिएतनामचे प्रधानमंत्री ले मिन्ह हुंग यांच्याशीही प्रधानमंत्र्यांनी द्विपक्षीय चर्चा केली. या भेटीत, प्रधानमंत्र्यांनी ब्रिक्स शिखर परिषदेत भागीदार देश म्हणून व्हिएतनामच्या सहभागाचं स्वागत केलं. आज नंतरच्या सत्रात प्रधानमंत्री चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

<><><><><>

जागतिक वित्तीय संस्थांमध्ये उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना अधिक प्रभावी स्थान मिळावं असं मत ब्रिक्स देशांच्या अर्थमंत्र्यांनी आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नररांनी एका निवेदनाच्या माध्यमातून व्यक्त केलं आहे. व्यापाराचं खंडित स्वरूप आणि जगात सध्या सुरु असलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर, या अर्थव्यवस्था आर्थिक लवचिकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं यात म्हटलं आहे. याशिवाय त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांसारख्या संस्था अधिक पारदर्शक करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची मागणीही केली आहे.

<><><><><>

भारत आणि चीन यांच्यात कोविड महामारीमुळे स्थगित झालेली विमानसेवा येत्या २१ सप्टेंबर पासून पुन्हा सुरु होणार आहे. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर चीनच्या सदर्न एअरलाईन्स या विमानकंपनीनं आज ही घोषणा केली. भारतीय विमान कंपनी इंडिगोनं या वर्षी मार्चमध्ये, शांघाय आणि कोलकाता दरम्यान दैनंदिन विमानसेवा सुरू केली असून चीनच्या बाजूनं देखील आता ग्वांगझू आणि नवी दिल्ली दरम्यान नियमित प्रवासी विमानसेवा सुरु होत आहे.

**<><><><><>**

बळाच्या जोरावर आणि उद्धटपणे दिलेल्या धमक्यांना इराण घाबरत नाही, असं इराणचे अध्यक्ष मसऊद पेझेश्कियान यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल ते एका कार्यक्रमात बोलत होते. राष्ट्रहिताचं रक्षण आणि शांततामय सहजीवन हेच इराणचं उद्दिष्ट असून इराणी समाजात दुहीची बीजं पेरणाऱ्या परकीय शक्तींचा पराभव करू, असं ते म्हणाले. अमेरिका आणि इस्राएलच्या सैन्याचं वर्णन सशस्त्र अतिरेकी असं करुन त्यांच्या हल्ल्यात १६८ शाळकरी मुलं ठार झाल्याचा उल्लेख पेझेश्कियान यांनी केला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीला भेट देतील. तसंच नवी मुंबईत वाशी इथं आयोजित हिंदी राजभाषा संमेलनाला उपस्थित राहतील. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात देशभरातून हिंदी भाषक, साहित्यिक, आणि संस्था प्रतिनिधी उपस्थित राहतील.

**<><><><><>**

अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा आता शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. हंगामातली शेवटची ग्रँडस्लॅम असलेल्या या स्पर्धेत प्रतिष्ठित आर्थर ॲश स्टेडियममध्ये महिला आणि पुरुष एकेरीचे अजिंक्यपदासाठीचे सामने आज आणि उद्या रंगणार आहेत. जाणून घेऊया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

*(पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात काल अग्रमानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्हनं कॅरेन खचानोव्हवर ६-३, ७-६, ७-६ असा थेट सेट्समध्ये पराभव केला आणि कारकीर्दीत दुसऱ्यांदा अमेरिकन ओपनच्या अंतिम फेरीत धडक मारली. यापूर्वी त्यानं २०२०मध्ये ही*

*फेरी गाठली होती, पण थरारक अंतिम सामन्यात त्याला डॉमिनिक थिएमकडून पराभव पत्करावा लागला होता. आता या पराभवाची पुनरावृत्ती होऊ न देता कारकीर्दीतलं दुसरं ग्रँडस्लॅम अजिंक्यपद मिळवण्याचं ध्येय झ्वेरेव्हसमोर असेल. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात बेन शेल्टननं फ्रान्सिस टियाफोवर ४-६, ६-३, ६-३, ७-५ अशी मात केली आणि पहिल्यांदाच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. २००३मध्ये अँडी रॉडिकनं पटकवलेल्या अजिंक्यपदानंतर पहिल्यांदाच हा बहुमान अमेरिकेला मिळवून देण्याच्या ध्येयानं बेन शेल्टन उद्या मैदानात उतरेल.*

*दुसरीकडे महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात दोन अग्रमानांकित टेनिसपटू एकमेकींविरुद्ध उभ्या ठाकणार आहेत. अग्रमानांकित अरीना साबालेंकासमोर दुसऱ्या क्रमांकावर असलेली एलेना रिबाकीना हिचं आव्हान असेल. सलग तिसऱ्यांदा अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावावर करण्याच्या उद्देशाने साबालेंका आज रात्री उशिरा मैदानात उतरेल. तर कारकीर्दीतलं तिसरं आणि यंदाच्या हंगामातलं दुसरं ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावण्याचं ध्येय रिबाकीनासमोर असेल.*

*दरम्यान, महिला दुहेरीचा खिताब कॅतरीना सिनियाकोव्हा आणि टेलर टाऊनसेंड या जोडीनं काल पटकावला. त्यांनी प्रतिस्पर्धी जोडीवर ५-७, ६-०, ६-२ अशी मात केली. पुरुष दुहेरीचा सामना आज आर्थर ॲश स्टेडियममध्ये रात्री रंगणार आहे.)*

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, दुबई इथं उद्या होणाऱ्या टी-20 आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. श्रीलंकेनं काल उपान्त्य सामन्यात पाकिस्तानचा चार गडी राखून पराभव करुन अंतिम फेरीत धडक मारली. सात वेळा विजेतेपद पटकावणारा भारतीय संघ साखळी फेरीत अव्वल स्थानावर आहे.

**<><><><><>**

डब्ल्यू एस पी एस नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या भक्ती शर्मा हिने १० मीटर एअर पिस्तुल एस एच वन स्पर्धेत कांस्य पदक पटकावलं आहे. सांघिक प्रकारात सृष्टी, भक्ती आणि सुमेधा यांच्या संघाने रौप्य पदकाची कमाई केली आहे.

**<><><><><>**

कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दक्षिण कोरियाला ५-१ ने पराभूत करून भारतीय महिला संघाने अंतिम फेरी गाठली आहे.

भारतीय पुरुष संघानेही काल उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात मलेशियाला ३-१ने हरवून अंतिम फेरी गाठली.

<><><><><>

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, राजकीय विश्लेषक आणि काँग्रेसचे माजी प्रवक्ते डॉ. रत्नाकर महाजन यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष आणि लोकबोधिनी संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केलं. युवक क्रांती दल आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्याकार्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलं. त्यांच्या पार्थिवावर आज पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत.

//<><><><><>//